# जाहीर प्रकटन / जाहिरात

श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्ट, सप्तशृंगगड या विश्वस्त संस्थेच्या विश्वस्त पदाच्या नेमणुकीची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली असून सदर निवड प्रक्रियेचा तपशील नाशिक जिल्हा न्यायालयाचे संकेतस्थळ https://nashik.dcourts.gov.in/document-category/notification/ व श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट, सप्तशृंगगड या विश्वस्त संस्थेचे संकेतस्थळ www.saptashrungi.net या संकेत स्थळांवर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

तरी विश्वस्त पदासाठी इच्छुक व पात्र व्यक्तींनी दि. २०/०९/२०२५ ते दि. ४/१०/२०२५ या कालावधीत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या नमुन्याप्रमाणे आपला विश्वस्त पदासाठीचा अर्ज प्रबंधक कार्यालय, जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक येथे सादर करावा.

आदेशावरून -

19/9/25

प्रबंधक,

जिल्हा व सत्र न्यायालय

**श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट, सप्तशृंगगड या विश्वस्त संस्थेच्या विश्वस्त नेमणुकीची प्रक्रिया सुरू**

आद्य स्वयंभू शक्तीपीठ श्रीक्षेत्र सप्तशृंगगड येथिल श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट, सप्तशृंगगड या विश्वस्त संस्थेच्या पूर्व विश्वस्त कार्यकारिणी मंडळाचा कार्यकाल हा पूर्ण होत असल्याने पुढील पाच (२०२५-३०) वर्षांच्या कालावधीसाठी **विश्वस्त पदाची निवड प्रक्रिया हि शनिवार, दि.** २०/९/२०२५ **पासून सुरू करण्यात येत आहे.** पात्र व इच्छुक व्यक्तीने निर्धारित करून दिलेल्या प्रक्रिये प्रमाणे आपला विश्वस्त पदासाठीचा विनंती अर्ज खालीलप्रमाणे नियोजित ठिकाणी सादर करावा.

**अर्ज कुणाच्या नावाने करावा?**

विश्वस्त पदासाठी पात्र आणि इच्छूक व्यक्तींनी मा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायधीश, नाशिक जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक यांचे नावे आपला अर्ज निर्धारित केलेल्या रकान्यात तपशिलवार माहिती भरून पोस्टाद्वारे अथवा स्वहस्ते नमूद दिनांकाच्या आत जमा करून पोहच पावती प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. ईमेलने अथवा इतर ऑनलाईन माध्यमातून पाठवण्यात आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**विश्वस्त पदासाठी अर्ज करण्यासाठी खालील व्यक्ती पात्र ठरतील :**

१. सदर अर्जदार व्यक्ती हिंदू धर्माचे सक्रिय पालन करणारा असावा.
२. दिवाळखोर नसलेली व्यक्ती.
३. सदर व्यक्तीचे ट्रस्टला प्रतिकूल असलेले कोणतेही हितसंबंध नसावेत.
४. नाशिक जिल्ह्यातील निवासी व्यक्ती.
५. सदर व्यक्तीचे वय २१ वर्षे पूर्ण केलेले असावे.
६. सदर व्यक्तीचे ट्रस्टशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक हितसंबंध (देणगीदार वगळता) नसावेत.
७. सदर व्यक्तीस कोणत्याही प्रकारच्या फौजदारी प्रकरणात शिक्षा झालेली नसावी अथवा पोलीस स्टेशनमध्ये कोणताही गुन्हा दाखल नसावा.
८. सदर व्यक्ती विश्वस्त संस्थेचा, स्थानिक स्वराज्य संस्थेचा अथवा कुठल्याही प्रकारच्या आर्थिक संस्थेचा थकबाकीदार नसावा.

**निवड प्रक्रियेतील संभाव्य प्राधान्यक्रम कसा असेल?**

प्राप्त अर्जा पैकी शिक्षणस्तर, कार्यानुभव, सेवा-भाव, चारित्र्य , सचोटी, पूर्व योगदान तसेच ज्येष्ठता यासह विचारात घेवून विश्वस्त पदाची निवड प्रक्रिया ही विचारधीन असेल. यासह अर्जदाराचे सामाजिक व धार्मिक जाणिवेचे भान, विश्वसनियता, सहकार्यभाव, स्वच्छ प्रतिमा व विश्वस्त संस्थेचे नावलौकिक अबाधित ठेवून उचित वर्तन पध्दतीने सेवेतील समर्पण भाव जपण्याची क्षमता तसेच विश्वस्त संस्थेची मालमत्ता, नावलौकिक आणि संबंधांचा वैयक्तिक कामकाजात विनियोग टाळून निशुल्क प्रकारातील सेवा-सुविधा बाबत अपेक्षा ठेवणार नाही किवा वैयक्तिक हितासाठी विश्वस्त संस्थेच्या नियोजनबद्ध कामकाजा अनावश्यक हस्तक्षेप करणार नाही. या बाबींचा देखील विचार कटाक्षाने केला जाईल.

**अर्जा सोबत कोणते कागदपत्रे जमा करायचे?**

अर्जा सोबत अर्जदारचे वैयक्तिक ओळखपत्र आकाराचे छायाचित्र, आधार कार्ड, पॅन कार्ड, नाशिक जिल्ह्यातील वास्तव्याचे अधिकृत प्रमाणपत्र, शैक्षणिक व अनुभव प्रमाणपत्र, अर्जदाराच्या उत्पन्नाबाबतची कागदपत्रे (उदा. वेतनचिट्ठी, फॉर्म १६अ, आयकर प्रमाणपत्र इ.), पोलिसांकडील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र तसेच रु. १०० च्या बॉंड पेपरवर कुठलाही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे अथवा न्यायालयात कुठलेहि फौजदारी प्रकरण प्रलंबित नसल्याबाबतचे बंधपत्र.

अर्जात नमूद केलेले तपशिलानुरूप आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

**ज्या अर्जात चुकीची, विसंगत किंवा अपूर्ण माहिती अथवा कागदपत्रांमध्ये अपूर्तता आढळून आल्यास असे अर्ज नाकारले जातील.**

**अर्ज जमा करण्याची अंतिम तारीख : दि.** ०४/१०/२०२५ **रोजी सायंकाळी** ५.०० **वाजे पावेतो.**
**उशिराने प्राप्त होणारे अर्ज हे निवडप्रक्रियेत समाविष्ट केले जाणार नाही.**

तरी इच्छुक व पात्र व्यक्तीनी विश्वस्त पदाच्या निर्धारित केलेल्या निवड प्रक्रिये प्रमाणे आपला विश्वस्त पदासाठीचा विनंती अर्ज नमूद केलेल्या वेळेच्या आधी प्रबंधक कार्यालय, जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक येथे सादर करावा.

**श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट,सप्तशृंगगड या विश्वस्त संस्थेच्या विश्वस्त पदासाठी विनंती अर्जाचा नमुना**

१) संपूर्ण नाव : ____________________

२) लिंग: ____________ ३) जन्मतारीख: ________

४) रक्तगट : ____________ ५) दि. ३०/९/२०२५ रोजीचे वय: ______

६) संपूर्ण पत्ता (सध्याचा): ____________________
परिसर: ____________ गाव: ____________
तालुका: ____________ जिल्हा: ____________
राज्य: ____________ पिनकोड: ____________

७)संपूर्ण पत्ता (कायमस्वरूपी): ____________________
परिसर: ____________ गाव: ____________
तालुका: ____________ जिल्हा: ____________
राज्य: ____________ पिनकोड: ____________

८) संपर्क क्र: प्राथमिक: ____________ पर्यायी: ____________

९) ई-मेल पत्ता: ____________________

१०) सोशल मिडिया लिंक तपशील:
व्हाट्सएप: ____________
फेसबुक: ____________
यु ट्यूब: ____________
लिंकडीन: ____________
ट्विटर: ____________
स्काय पे: ____________
टेलिग्राम: ____________
को: ____________

११) शिक्षण स्तर : ____________
माध्यमिक शालांत
उच्च माध्यमिक शालांत
पदविका
महाविद्यालयीन (पदवी)
उच्च महाविद्यालयीन (पदवीत्तर)
व्यावसायिक अभ्यासक्रम

१२) वार्षिक उत्पन्न : ____________

१३) व्यवसाय: (वैयक्तिक/संयुक्तिक/सामाजिक) : ____________

१४) नोकरी: (शासकीय / निमशासकीय / खाजगी) : ____________

१५) आपल्याकडे स्वतःची फर्म / संस्था आहे का? : ____________

१६) आपल्या कडे स्वतःचे वाहन (चारचाकी) आहे का? ____________

१७) आपण कोणत्या राजकीय पक्ष / सामाजिक संस्थाशी संबंधित आहात? ____________

१८) आपली राजकीय पक्ष / सामाजिक संस्था संबंधित जबाबदारी काय आहे? ____________

१९) आपल्याला राजकीय कामकाज / सामाजिक उपक्रम आदींचा किती वर्षांचा अनुभव आहे? ____________

२०) विश्वस्त व्हावं असं आपणास का वाटलं? ____________________

२१) विश्वस्त पद कोणत्या कायद्याअंतर्गत अंतर्भूत आहे? ____________________

२२) आपण यापूर्वी इतर कोणत्याही संस्थेत विश्वास पदावर काम केले आहे का? (असल्यास विश्वस्त संस्थेचे नाव, संपूर्ण पत्ता व कालावधी) : ____________________

२३) श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्ट या विश्वस्त संस्थेची नोंदणी कधी झाली आहे? : ____________________

२४) श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्ट या विश्वस्त संस्थे कामकाज आणि सेवा सुविधा काय आहेत? ____________________

२५) श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्ट या विश्वस्त संस्थेला आपण कितीदा भेट दिली आहे? ____________________

२६) श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्ट विश्वस्त संस्थे संबंधित दैवत्वाचे स्वरूप व आख्यायिका काय आहे? ____________________

२७) श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्ट येथे आपण देणगी दिलेली आहे का? ____________________

२८) श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्ट येथे आपण देणगीदार भाविक म्हणून नोंदणीकृत आहात का? ____________________

२९) विश्वस्त संस्थेच्या कार्यरत अथवा माजी विश्वस्त प्रतिनिधी यांना आपण ओळखतात का? ____________________

२८) विश्वस्त संस्थेच्या कार्यरत अथवा माजी अधिकारी व कर्मचारी यांना आपण ओळखतात का? ____________________

३१)) श्रीक्षेत्र सप्तश्रृंगगड येथे आपली वैयक्तिक मालकीची दुकान / जागा / घर / शेत आहे का? ____________________

३२) विश्वस्त संस्थेच्या कोणत्याही भूखंड व मालमत्ता यांवर आपले अथवा आपल्या कुटुंबातील अन्य व्यक्तींचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे अतिक्रमण अथवा हस्तक्षेप आहे का? ____________________

३३) विश्वस्त संस्थेच्या कोणत्याही लिलाव हक्का मध्ये आपण अथवा आपले कुटुंबातील अन्य व्यक्ती हे थकबाकीदार आहात का? : ____________________

३४) आपण आर्थिक गैरव्यवहार / कर्जबुडवे प्रकारात अथवा फसवणुकीत सहभागी आहात का? ____________________

३५) आपले कोणतेही दिवाणी अथवा फौजदारी प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे का? ____________________

३६) आपल्या वर कोणताही गुन्हा दाखल आहे का? ____________________

३७) आपणांस कोणत्याही गुन्ह्यात शिक्षा झाली आहे का? ____________________

३८) आपली विश्वस्त म्हणून निवड झाल्यास कोणत्या कार्याला अधिक प्राधान्यक्रम द्याल? ____________________

३९) पण विश्वस्त झाल्यास कोणत्या विषयात अधिकतम योगदान देणे अपेक्षित ठेवाल ? ____________________

४०) विश्वस्त संस्थेने आपणांस कोणकोणत्या सुविधा देणे अपेक्षित आहे? ____________________

**ठिकाण :** **स्वाक्षरी** ____________________

दिनांक : पूर्ण नाव ____________________